नागपूरमध्ये सायबर सुरक्षेची व्याप क मोहीम; २,८५७ हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला संदेश ;'सायबर शिक्षा फॉर सायबर सुर क्षा २०२६-२७' उपक्रमांतर्गत शह रसह ग्रामीण भागात जनजागृती; ८ शाळा-महाविद्यालये आणि २०० हून अधिक समुदाय सदस्यांचा सह भाग

Posted on September 18, 2026 by Prakaash Khilare



'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा २०२६-२७' उपक्रमांतर्ग नागपूर शहर व ग्रामीण भागात जनजागृती; ८ शाळा-महाविद्यालयांतील २,८५७ हून अधिक विद्यार्थी आणि २०० हून अधिक समुदाय सदस्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश.

मितेश गोसावी आणि अमोघ जयस्वाल यांच्या सहभागातून नागपुरमध्ये ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, सोशल मीडिया सुरक्षा आणि डिजिटल सुरक्षिततेबाबत जनजागृती पूर्तता.


ब्रिक्स हीन फाउंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा २०२६-२७' या उपक्रमांतर्गत शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर येथील जी-१ समुहातील मितेश गोसावी आणि अमोघ जयस्वाल यांनी नागपूर शहर तसेच ग्रामीण भागात व्यापक सायबर जनजागृती अभियान राबविले. या अभियानाची यशस्वी पूर्तता करण्यात आली असून, विद्यार्थ्यांसह समाजातील विविध घटकांपर्यंत सुरक्षित डिजिटल व्यवहारांचा संदेश पोहोचविण्यात आला.

या अभियानाअंतर्गत जी-१ समुहाने ८ शाळा व महाविद्यालयांमध्ये सायबर जनजागृतीपर सादरीकरणे घेतली. या माध्यमातून २ हजार ८५७ हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेची माहिती पोहोचविण्यात आली. त्याचबरोबर २०० हून अधिक समुदायातील नागरिकांमध्ये सायबर गुन्हे आणि डिजिटल सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यात आली.

अभियानामध्ये ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, बनावट ओळखीद्वारे होणारे सायबर गुन्हे, सोशल मीडिया सुरक्षा, डिजिटल सुरक्षितता तसेच वाढत्या सायबर धोक्यांपासून बचाव करण्याच्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. डिजिटल माध्यमांचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी, संवायसव्द संदेश किंवा लिंकापासून कसे सावध राहावे आणि ऑनलाइन व्यवहार अधिक सुरक्षितपणे कसे करावेत, याबाबतही जनजागृती करण्यात आली.

विद्यार्थ्यापासून विविध समुदाय घटकांपर्यंत जनजागृती

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सायबर जनजागृती केवळ विद्यार्थी आणि शैक्षणिक संस्थांपुरती मयार्दित न ठेवता समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्यात आली. पोलीस अधिकारी, आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ, शासकीय प्रतिनिधी तसेच ग्रामीण विकास संस्थांमार्फत विविध समुदाय घटकांशी संवाद साधत सायबर सुरक्षेचा संदेश देण्यात आला.



नागपूर शहरासोबतच ग्रामीण भागातील नागरिकांमध्येही सुरक्षित डिजिटल व्यवहार, ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव आणि सायबर धोक्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यावर अभियानात भर देण्यात आला.

मार्गदर्शकांच्या सहकार्याने अभियानाची पूर्तता

हे अभियान शिक्षक सन्मयक डॉ. आशिष बडिये आणि संचालक डॉ. संजय ठाकरे, शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले. तसेच ब्रिक्स हीलचे अमोरिप्रसेट डायरेक्टर अजय सिंह, गायत्री कैसर आणि दिपू सिंह यांचे मार्गदर्शन व सहकार्य या अभियानाला लाभले.

युवकांच्या सहभागातून सुरक्षित डिजिटल समाजाचा संदेश

विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या अभियानामुळे सायबर सुरक्षेचा संदेश शैक्षणिक संस्था तसेच समाजातील विविध स्तरांपर्यंत पोहोचला. वाढत्या डिजिटल व्यवहारांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी ऑनलाइन जगताल अधिक सतर्क आणि जबाबदार राहण्याची गरज या अभियानातून अधोरेखित करण्यात आली.

युवकांनी स्वत: सायबर सुरक्षेची माहिती आत्मसात करून ती इतरांपर्यंत पोहोचविल्यास सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल समाजाच्या निर्मितीला हातभार लागू शकतो, हा संदेश या अभियानातून देण्यात आला.

अभियानाची ठळक कामगिरी

८ शाळा व महाविद्यालये) / २,८५७+ विद्यार्थी / २००+ समुदाय सदस्य / नागपूर शहर व ग्रामीण भागात सायबर जनजागृती

Prakaash Khilare

प्रकाश खिलारे हे स्थानिक वृत्तपत्र वितरित करतात मीडिया चे सहसंपादक असून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि स्थानिक घडामोडींवरील बातम्यांचे पृनांकन करतात. जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे, स्थानिक पातळीवरील माहत्याच्या घटनांची अचूक माहिती वाचकांपर्यंत पोहोचवणे आणि निष्पक्ष पत्रकारितेच्या मापदण्डाचे समतोलपणे जोपासने हेसाही हा त्यांचा लेखनाचा मुख्य उद्देश आहे. डिजिटल पत्रकारितेच्या माध्यमातून ते विविध विषयांवर सखोल आणि प्रभावी बातम्या प्रकाशित करतात. अण्णा जनजागरण परिवारतील बातम्या, माहिती त्वरेन लेख देण्याकरिता संपर्क करू शकतात.....

मो. 9112225235

Email- prakaashkhilare@gmail.com

Published in Quick Heal Foundation, नागपूर जिल्हा, विदर्भ, शिक्षण, सायबर सुरक्षा जनजागृती

Tagged Prakaash Khilare, Quick Heal Foundation, अजय सिंह, अमोघ जयस्वाल, ऑनलाइन फसवणूक, ऑनलाइन सुरक्षा, ब्रिक्स हीत फाउंडेशन, गायत्री केसर, जी-१ समूह, डिजिटल सुरक्षितता, डॉ. आशिष बडिये, डॉ. संजय ठाकरे, दिपू सिंह, नागपूर ग्रामीण, नागपूर शहर, नागपूर ग्रामीण भाग, नागपूर जिल्हा, नागपूर तालुका, नागपूर शहर, नागपूर सायबर जनजागृती, नागपूर सायबर सुरक्षा, मितेश गोसावी, महाराष्ट्र, महाविद्यालय सायबर सुरक्षा, मितेश गोसावी, विद्यार्थी सायबर जनजागृती, शाळा सायबर सुरक्षा, शासकीय न्यायसहायक विज्ञान संस्था नागपूर, सायबर गुन्हे, सायबर जनजागृती, सायबर जागरूकता अभियान, सायबर मोहीम फॉर सायबर सुरक्षा, सायबर सुरक्षा, सोशल मीडिया सुरक्षा